॥श्री राम समर्थ॥ ॥श्री नागनाथ प्रसन्न॥
महेश गायकवाड मो. ९७६७०४०८४३ ७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
टोमॅटो, मिरची, वांगी, ब्रेंझु, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर, शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, पपई (७८६),पपई आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातींची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच ग्रॅंड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २३७ वा | बुधवार, दि. २९ एप्रिल २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# श्री भगवंत मंदिर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील प्रस्तावित कामांना मंजुरी देणार- मुख्यमंत्री

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते भगवंत मंदिर येथे महापूजा व घरकूल लाभार्थ्यांना घराच्या चावीचे वितरण

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** बार्शी शहर भगवंत मंदिरासाठी प्रसिद्ध आहे. भगवान विष्णूला समर्पित आणि बाराव्या शतकातील या हेमाडपंती शैलीतील मंदिराचा विकास आराखडा प्रशासनाकडे सादर झालेला आहे. हा आराखडा राज्य शिखर समितीकडे आल्यानंतर त्यात प्रस्तावित केलेली कामे व निधीप्रमाणे शासनाकडून मंजुरी देण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी दिली.

बार्शी येथील श्री भगवंत मंदिर येथे श्री भगवंत प्रकट दिनानिमित्त आयोजित महापूजा मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या हस्ते करण्यात आली. त्यानंतर बार्शी शहरात प्रधानमंत्री आवास योजना व रमाई आवास योजनेअंतर्गत घरकूल लाभार्थ्यांना मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते घराच्या चावीचे







वितरण करण्यात आले. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, धाराशीव जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अर्चनाताई पाटील, माजी आमदार राजेंद्र राऊत, सोलापूर जिल्हाधिकारी कार्तिकियेन एस., बार्शी नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष श्रीमती तेजस्वीनी कथले आदी उपस्थित होते.

विष्णु पुराणातही या परिसरात आढळून येतो. प्राचीन काळापासून आलेल्या लोकपरंपरा, अध्यात्म तसेच ऐतिहासिक व सांस्कृतिक ठेवा जपणे हे गरजेचे आहे. या सांस्कृतिक ठेव्याला जनतेपर्यंत आणण्यासाठी तयार करण्यात आलेल्या आराखड्याला मान्यता देण्यात येईल आणि श्री भगवंत मंदिर तीर्थ क्षेत्र विकास आराखडयातून या भागाचा विकास करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

प्रारंभी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते श्री भगवंत यांची महापूजा व आरती करण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते.

## राजेंद्र राऊत यांना अजून भरपूर राजकीय आयुष्य व भविष्य - मुख्यमंत्री

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** पुराणा मध्दे श्री भगवंताचे मोठे महत्व आहे. पुराणामध्ये याचा उल्लेख आहे.बाशीर्ला मोठी ऐतिहासिक व पौराणिक परंपरा आणि ठेवा लाभलेला आहे. तो पुढे सुरू ठेवण्यासाठी आणि याला आणखीन मोठे रूप येण्यासाठीव श्री भगवंत तीर्थक्षेत्र विकास आराखडा राजेंद्र राऊत यांनी सादर केला आहे. त्याला सरकार पूर्ण समर्थन देईल अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत दिली.

वैशाख शुध्द द्वादशीला श्री भगवंत प्रकटदिन दरवर्षी उत्साहात साजरा होतो. मंगळवार



दि. २८ रोजी या भगवंत प्रकट दिन सोहळयाच्या निमीत्ताने बार्शी येथे आल्यानंतर पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी माजी आमदार राजेंद्र राऊत, सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, जि प अध्यक्ष दीपक वैद्य, अर्चना पाटील, नगराध्यक्ष तेजस्विनी कथले उप नगराध्यक्ष रोहित पाटील वर्षा झाडबुकेआदी उपस्थित होते. माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्या विधानपरिषद उमेदवारीबाबत त्यांनी कोणतेही थेट उत्तर दिले नाही. वरिष्ठ पातळीवर हे निर्णय होतात असे त्यांनी सांगितले. परंतु राजेंद्र राऊत यांना भविष्यात मोठी पद मिळतील त्यांचे भविष्य उज्वल आहे असेही ते म्हणाले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकात राऊत यांनी मोठे यश मिळवले त्याबद्दल त्यांनी राऊत यांचे कौतुक केले. आणि विधानसभेला मतदारांनी केलेली चूक दुरुस्त करून राऊत याना भरभरून प्रेम दिले असेही ते म्हणाले.

## छत्रपती शिवाजी महाराजांना फडणवीसांना अभिवादन करण्याचा अधिकार नाही – कॉ. प्रा. ठोंबरे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्याचा अधिकार नाही. आमदार संजय गायकवाड याने छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केला आहे, महाराष्ट्रातील आई बहिणींच्या वर शिवीगाळ करत कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या खूणाचे समर्थन केले आहे, छत्रपतींच्या पुस्तक प्रकाशक प्रशांत आंबीला जीवे मारण्याची धम दिली आहे; यासोबतच बागेश्वर धामचा धरेंद्र शास्त्री याने देखील छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान केला आहे. महाराष्ट्र मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या गुरुचा वाद पुन्हा निर्माण केला जात आहे. यापूर्वीही कोशारीने छत्रपतींचा, महात्मा फुलेंचा, भाऊराव पाटील यांचा अपमान केला आहे. इंग्रजांची हुजरेगीरी करणारे व स्वातंत्र्यसंग्रामामध्ये नसणारी आरएसएस-भाजपा आज सत्तेवर बसली आहे. हे सर्व तेच घडवून आनत आहेत; नरेंद्र मोदी आणि देवेंद्र फडणवीसांनी असे गुंड पाळले आहेत. छत्रपती शिवाजी-फुले -बाबासाहेब आंबेडकरांची बदनामी करण्यासाठीच



भाजपचा जन्म झाला आहे. इतिहास बदलण्याचेकाम भाजप करीत आहे. मुख्यमंत्री जोपर्यंत आमदार संजय गायकवाड या आमदाराला अटक करत नाही तोपर्यंत छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यासाठी कोणता अधिकार त्यांना आहे ? असा प्रश्न कॉम्रेड प्रा. तानाजी ठोंबरे यांनी केला. ते भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने दिनांक 27 एप्रिल 2026 वार सोमवार रोजी शिवसृष्टी बार्शी येथे झालेल्या आमदार संजय गायकवाडला अटक करण्याच्या मागणीच्या निदर्शने आंदोलनामध्ये बोलत होते.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे आनंद काशीद, बामसेफचे तानाजी बोकेफोडे, काँग्रेसचे निखिल मस्के, सतिश पाचकुडवे, अजित कांबळे, अनिसचे पा.न. निवाणीकर, सत्यभामा जाधवर, जनाबाई लोकरे, उडाण फाउंडेशनचे जमील खान, ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेचे कॉम्रेड ए. बी. कुलकर्णी, डॉ. प्रवीण मस्तुद, डॉक्टर जगदाळे मामा हॉस्पिटल श्रमिक संघाचे लहू आगलावे, बांधकाम कामगार संघटनेचे अनिरुद्ध नखाते, बालाजी शितोळे , बार्शी नगरपालिका कंत्राटी कामगार संघटनेचे शौकत शेख, भारत भोसले, भारत चव्हाण, अखिल भारतीय किसान सभेचे लक्ष्मण घाडगे, धनाजी पवार , आनंद गुरव, श्रीकांत सोरेगांवकर, अब्बास बागवान, भारती मस्तुद , निर्मला सरवदे, सुनिल ढगे, प्रमोद मंडलिक आदी उपस्थित होते.

## सिद्धेश्वर एक्सप्रेस ७ तास उशिरा, वंदे भारत ट्रेनही रद्द

### रेल्वे अपघातामुळे सोलापूरकडील वाहतूक विस्कळीत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुणे स्टेशनजवळ मुंबई-सोलापूर वंदे भारत ट्रेनला सोमवारी सायंकाळी किरकोळ अपघात झाल्यानं वाहतुकीवर परिणाम झाला आहे. वंदे भारत ट्रेनचा एक डबा रुळावरुन घसरल्याने ही दुर्घटना घडली होती.

या अपघातात कुठलीच जीवितहानी झाली नाही मात्र या घटनेचा रेल्वे वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे.

वंदे भारत एक्सप्रेसचा डबा रुळावरून घसरल्याने झालेल्या अपघातामुळे सोलापूरकडे येणाऱ्या रेल्वे वाहतुकीला फटका बसला आहे. विशेष म्हणजे सोमवारी सायंकाळी झालेल्या दुर्घटनेनंतर सोलापूरकडे जाणाऱ्या रेल्वेची वाहतूक विस्कळीत झाली



होती. मात्र अपघाताच्या दुसऱ्या दिवशीही वाहतूक सुरळीत झाली नाहीये. सिद्धेश्वर एक्सप्रेससह अनेक गाड्या तब्बल ६ ते ७ तास उशिराने सोलापूरला पोहोचल्याने रेल्वेचे वेळापत्रक कोलमडले आहे.

मुंबई, पुणे तसेच दक्षिण भारतातून येणाऱ्या गाड्यांना मार्ग मिळत नसल्यानं त्या ठिकठिकाणी थांबत थांबत पुढे सरकत होत्या. सिद्धेश्वर एक्सप्रेस साडेसात तास उशिराने सोलापूरला दाखल झाली. तर उद्यान एक्सप्रेस सुमारे पाच तास उशिराने पोहोचली. चेन्नई, कोईमतूर, नागरकोईल, तिरुपती मार्गावरील अनेक गाड्यांही ७ ते ८ तास विलंब झाला होता. गाड्यांची स्थिती अनेक गाड्यासह ते सात तास उशिराने पोहोचल्या तर काही गाड्या रद्दही करण्यात आल्या आहेत.

सोलापूर-मुंबई २८ एप्रिल रोजीची वंदे भारत एक्सप्रेस रद्द करण्यात आली. तर मुंबई-चेन्नई, मुंबई-बंगळूरु उद्यान एक्सप्रेस यासारख्या प्रमुख गाड्या कर्जत, भिवपुरी, नेरळ, वांगणी आणि अंबरनाथ स्थानकावर थांबून ठेवण्यात आल्या आहेत. रेल्वेतून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची मोठी गैरसोय झाली आहे.

मुंबईवरुन सोलापूरला जाणाऱ्या वंदे भारत एक्स्प्रेस ट्रेनचा अपघात पुणे स्टेशनच्या प्लॅटफॉर्म नंबर ३ वर येत असताना झाला होता. त्यामुळे प्लॅटफॉर्म क्रमांक ३ वर येणाऱ्या ट्रेनचे मार्ग बदलण्यात आले आहेत. वंदे भारत एक्स्प्रेसचा रुळावरुन घसरलेला डबा पूर्ववत करण्याचं काम आज सकाळपर्यंत सुरू होतं.

## उष्णतेच्या पार्श्वभूमीवर पशुसंवर्धन विभाग सतर्क

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यात वाढत्या तापमानाचा व 'एल निनो'च्या प्रभावाचा विचार करून पशुसंवर्धन विभागाने पशुधनाच्या संरक्षणासाठी व्यापक मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. सोलापूर जिल्ह्यासह उष्णतेचा तीव्र फटका बसणाऱ्या भागांमध्ये विशेष दक्षता घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पुण्याच्या पशुसंवर्धन आयुक्तालयाने दिलेल्या माहितीनुसार, उष्णतेमुळे पशुधनावर विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे सर्व पशुवैद्यकीय संस्था सतर्क ठेवण्यात आल्या असून, आवश्यक औषधसाठा उपलब्ध ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच, फिरते पथक तातडीच्या सेवेसाठी सज्ज ठेवण्यात आले आहे. उष्माघात



टाळण्यासाठी पशूंना स्वच्छ व थंड पाणी, संतुलित आहार आणि सावलीची व्यवस्था करणे अत्यावश्यक असल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे.

शेतातील कामासाठी वापरल्या जाणाऱ्या जनावरांना सकाळी ११ ते दुपारी ४ या तीव्र उन्हाच्या काळात विश्रांती देण्याचा सल्ला देण्यात आला आहे. तसेच, गोठ्यांवर गवताचे आच्छादन, पाण्याचा शिडकावा तसेच पंखे किंवा स्प्रिंकलरचा वापर करून तापमान नियंत्रित ठेवण्याच्या सूचना आहेत. उष्णतेची लक्षणे दिसल्यास त्वरित जनावरांना थंड ठिकाणी हलवून पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, जिल्हा प्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था व सामाजिक संघटनांनी रस्त्यावरील जनावरांसाठी सार्वजनिक ठिकाणी पाण्याची व्यवस्था करावी, अशी सूचना देण्यात आली आहे. पशुपालकांनी या सूचनांचे पालन करून पशुधनाचे आरोग्य जपावे, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाकडून करण्यात आले आहे. उष्ण लहरींच्या काळात काय करावे ? पशूंना सतत स्वच्छ व थंड पाणी उपलब्ध ठेवावे. सावलीत निवारा व वायुवीजनाची व्यवस्था करावी. संतुलित आहार द्यावा. उष्णतेच्या वेळेत काम टाळावे.

गोठ्यात पाणी शिंपडून तापमान कमी ठेवावे. उष्ण लहरींच्या काळात काय करू नये ? उन्हात दीर्घकाळ जनावरे उभी ठेवू नयेत. बंद वाहनात पशुधन ठेवू नये. तीव्र उन्हात वाहतूक टाळावी. पाण्याची कमतरता होऊ देऊ नये. 'एल निनो'च्या संकट काळात पशुपालकांनी पशुसंवर्धन विभागामार्फत देण्यात येणाऱ्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे.

चारा व्यवस्थापन व पशुधनाच्या आरोग्याबाबत कोणत्याही मदतीसाठी स्थानिक पशुवैद्यकीय दवाखान्याशी संपर्क साधावा. तसेच १९६२ कॉल सेंटरच्या माध्यमातून पशुसंवर्धनविषयक सेवा व मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यात आले आहे.

**- डॉ. अनिल तांबे,**
उपायुक्त, पशुसंवर्धन व दुग्धविकास, सोलापूर

## नगरपालिकेच्या विद्युत विभागात प्रचंड भ्रष्टाचार; 'हम करे सो कायदा'प्रमाणे कारभार

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** सांगोला नगरपालिकेच्या विद्युत विभागातील विद्युत अभियंत्यांनी मनमानी व भ्रष्टाचारी कारभार सुरू केला आहे. 'हम करे सो कायदा' याप्रमाणे या अभियंत्याचे कामकाज सुरू असून, त्यांच्या भ्रष्ट व मनमानी कारभाराची समितीमार्फत चौकशी करून त्यांना तात्काळ निलंबित करावे, अशी मागणी आजी-माजी नगरसेवकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

सांगोला नगरपालिकेत प्रशासकाच्या काळात पदभार स्वीकारलेला विद्युत विभागाचा अभियंता, "मीच खूप अभ्यासू आहे आणि इतरांना काही समजत नाही," अशा अविभार्वात सर्वांची दिशाभूल करत आहे. विद्युत विभागातील प्रत्येक खरेदीमध्ये हा अभियंता भ्रष्टाचार करत असून, जनतेतून निवडून आलेल्या नगरसेवकांना विश्वासात न घेता प्रभागांमध्ये मनमानीपणे कामकाज करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्या ठेकेदारांकडून 'अर्थपूर्ण' वाटाघाटी करून हा अभियंता त्यांना पाठीशी घालत आहे.

प्रत्येक कामात भ्रष्टाचार सुरू असून सर्वसामान्यांना मात्र नियम दाखवले जातात. या भ्रष्ट अधिकाऱ्याच्या मनमानी कारभारामुळे नगरपालिकेने महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीची (MSEDCL) बिले वेळेवर भरलेली नाहीत. परिणामी, नगरपालिका फंडातील लाखो रुपये दंड आणि व्याजापोटी भरावे लागले आहेत. हा दंड आणि व्याजाची रक्कम संबंधित अभियंत्याकडून वसूल करणे गरजेचे असताना, याकडे कोणीही लक्ष देत नाही. विशेष म्हणजे, विरोधी पक्षनेतेही या विषयावर मूग गिळून गप्प असल्याचा आरोप होत आहे.

जर बिले वेळेवर भरली असती, तर नगरपालिकेचे लाखो रुपये वाचले असते आणि त्या निधीतून शहरात अनेक विकासकामे झाली असती.

केवळ या अभियंत्याच्या जाणीवपूर्वक केलेल्या दिरंगाईमुळे पालिकेला बसलेला हा भुर्दंड त्याच्या पगारातून वसूल करावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणाची समिती नेमून चौकशी करावी आणि दोषी अभियंत्यास तात्काळ निलंबित करून भ्रष्टाचाराचे पैसे वसूल करावेत, अशी मागणी आजी-माजी नगरसेवकांनी लावून धरली आहे.

> "या विद्युत अभियंत्याने केलेल्या भ्रष्टाचाराला वाचा फोडून, त्याची सखोल चौकशी होऊन त्याला निलंबित करेपर्यंत हा लढा असाच सुरू राहील."

## विविध विकासकामांमध्ये मक्तेदारांची तब्बल 50 कोटी रुपयांची थकबाकी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या विविध विकासकामांमध्ये मक्तेदारांची तब्बल 50 कोटी रुपयांची थकबाकी गेल्या चार वर्षांपासून प्रलंबित असल्याने अखेर संतापाचा उद्रेक झाला आहे.

महापालिका कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशनच्या वतीने 1 मेपासून कामबंद आंदोलनाचा इशारा देण्यात आला असून, या आंदोलनात 300 हून अधिक मक्तेदार सहभागी होणार आहेत.

महापालिकेच्या झोन क्रमांक 1 ते 8 अंतर्गत भांडवली, देखभाल-



दुरुस्ती तसेच विविध विकास योजनांची कामे पूर्ण करूनही संबंधित बिलांचे पैसे मिळाले नसल्याचा आरोप मक्तेदारांनी केला आहे. या संदर्भातील बिले मुख्य लेखापाल कार्यालयाकडे सादर करण्यात आली असली तरी निधीअभावी ती प्रकरणे रखडली आहेत. परिणामी, आर्थिक ताण वाढल्याने मक्तेदारांना कामे सुरू ठेवणे कठीण झाले आहे.

कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष रामकृष्ण दुधाळ यांनी सांगितले की, महापालिकेने तत्काळ ठोस धोरण ठरवून थकबाकी अदा करावी, अन्यथा 1 मेपासून कोणतेही काम केले जाणार नाही. या इशाऱ्यामुळे शहरातील सुरू असलेल्या तसेच नियोजित विकासकामांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949

आरोग्यविषयक
मुळव्याध आहे ?
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.
संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी ताः औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450

शिनगारे सिटी वासुद रोड अल्टिमेट जिमच्या समोर सांगोला
प्लॉट देणे आहे
N.A.
3100 sft- 3200 sft
- : संपर्क : -
शिनगारे.जे.एम 8275274353
डी.बी.शिंदे 9579421465

VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007

### वात्रटिका

**फॉलोअर्स कमी झाले**

लोक किती डोक्यावर
घेतील सांगता येत नाही...
तेच लोक पुन्हा पायाखाली
कधी घेतील सांगता येत नाही...
आलटून पालटून येतील दिवस
लोकांना भिवून राहिले पाहिजे...
संधी मिळाली कधी तर लगेच
इकडून तिकडे गेले पाहिजे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

## संपादकीय

# मराठी शाळा टिकवण्यासाठी...

मराठी की, इंग्रजी या वादापलीकडे जाऊन दोन्ही भाषांचा समतोल साधणे ही आजच्या शिक्षणाची खरी गरज आहे. आजच्या आधुनिक काळात शिक्षणाचे माध्यम हा एक महत्त्वाचा आणि चर्चेचा विषय बनला आहे. मुलांना कुठल्या शाळेत घालायचे, 'मराठी माध्यम की, इंग्रजी माध्यम ?' हा प्रश्न अनेक पालकांसमोर उभा राहतो. बहुतांश पालक इंग्रजी माध्यमाकडे वळताना दिसत आहेत. हळूहळू मराठी शाळाही कमी होत आहेत. भविष्यात मराठी शाळा टिकवायच्या असतील, तर मराठी शाळेत इंग्रजी भाषेची गुणवत्ता सुधारली पाहिजे. खरं पाहता, मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांचा समतोल राखणे ही काळाची गरज आहे. म्हणूनच, 'मराठी की, इंग्रजी' हा प्रश्न नसून 'मराठी आणि इंग्रजी' असा विचार करणे अधिक योग्य ठरेल.

काही विद्यार्थी इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेतात; पण त्यांना स्वतःची मातृभाषा म्हणजेच मराठी लिहिताना अडचणी येतात. साधे उकार, वेलांटी यांसारख्या मूलभूत गोष्टींबद्दल शंका विचारताना दिसतात. कधी कधी एखादी दोन किंवा तीन अंकी संख्या मराठीत सांगितली, तरी त्यांना समजत नाही. ते विचारतात, 'या संख्येला इंग्रजीत काय म्हणतात ?' ही गोष्टही चिंताजनक आहे. म्हणूनच कोणतीही एक भाषा पुरेशी नाही. मराठी माध्यम आणि इंग्रजी या दोन्हींचा योग्य समतोल असणं अत्यंत आवश्यक आहे. मराठी ही आपली ओळख, संस्कृती आणि विचारांची भाषा आहे, तर इंग्रजी ही जागतिक स्तरावर संवाद साधण्याचं प्रभावी माध्यम आहे. आपल्या मातृभाषेत शिक्षण घेणे गरजेचे आहेच, कारण त्यामुळे विद्यार्थ्यांची समज अधिक चांगली होते. विचारशक्ती वाढते. तसेच, लहानपणी आपल्या भाषेत शिकल्यामुळे संकल्पना स्पष्ट होतात. परंतु, आजच्या काळात इंग्रजीचे महत्त्व खूप वाढले आहे. कोणतेही पालक मराठी शाळेच्या विरोधात नसतात; पण उच्च शिक्षण, नोकरी आणि जागतिक पातळीवरील संधी मिळवण्यासाठी इंग्रजीत प्राविण्य असणे आवश्यक आहे. याच कारणामुळे अनेक पालक आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाकडे वळवतात. म्हणूनच मराठी शाळांमध्ये इंग्रजी भाषेचे दजेर्दार आणि व्यावहारिक ज्ञान देणे अत्यावश्यक आहे. शिक्षण पद्धतीत काळानुसार बदल केला नाही, तर केवळ शाळाच नाही, तर कालांतराने मराठी भाषादेखील संपुष्टात येईल.

मराठी माध्यमात शिकूनही मोठे यश मिळवता येते; पण त्यासाठी जास्त मेहनत घ्यावी लागते. मराठी शाळेत शिकलेली अनेक मुले परदेशात जातात. तसेच इंजिनिअर, डॉक्टर पदवी मिळवतात. परंतु, हे सगळे साध्य होण्यासाठी इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांना अधिक कष्ट हे घ्यावेच लागतात. बऱ्याचदा आपण बघतो की, मोठ्या मोठ्या कंपन्यांमध्ये नोकरी मिळवताना काही विद्यार्थ्यांकडे भरपूर ज्ञान असते; पण इंग्रजीतील संवाद कौशल्य कमी असते. त्यामुळे त्यांना नोकरी मिळवताना अडचणी येतात. तर काही विद्यार्थ्यांकडे त्यांच्यापेक्षा कमी ज्ञान असूनही फक्त इंग्रजीच्या जोरावर ते नोकरी मिळवतात. मराठी शाळांमध्ये इंग्रजी विषय प्रभावीपणे शिकवला गेला, तरच लोकांचा दृष्टिकोन बदलू शकतो. एक उदाहरण द्यायचे झाले, तर इंग्रजीप्रमाणेच हिंदी ही रोजच्या जीवनातील बोलीभाषा नाही; पण आपण ती चांगल्या प्रकारे बोलू शकतो आणि समजू शकतो. कारण, लहानपणापासूनच टीव्हीवर कार्टून, चित्रपट इत्यादींमधून आपण ती आत्मसात केलेली असते. रोजच्या शाळेच्या वेळापत्रकात इंग्रजीसाठी वेळ देऊन त्यात चांगले प्रशिक्षण दिले, तर नक्कीच फायदा होईल. मराठी शाळेत इंग्रजीचे चांगले प्राध्यापक असणे ही काळाची गरज आहे. फक्त पुस्तकापुरते इंग्रजी न ठेवता, बोलणे, ऐकणे, लिहिणे आणि समजून घेणे या सर्व गोष्टींवर भर दिला पाहिजे. मराठी शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी इंग्रजी भाषेची गुणवत्ता सुधारणे हे एक महत्त्वाचे पाऊल ठरू शकते. जर मराठी शाळांनी हे वास्तव स्वीकारून शिक्षणपद्धतीत बदल केला, तर नक्कीच पालकांचा विश्वास पुन्हा मिळवता येईल. म्हणूनच, मराठी माध्यम आणि इंग्रजीतील प्राविण्य यांचा समतोल साधणे ही काळाची गरज आहे. 'बदल केला तरच बदल घडेल' हाच संदेश यातून देता येईल.

# लोकसंख्या वाढीनुसार लोकसभा सदस्य संख्या वाढविण्याचे सरकारला सुचले

## तर लोकसंख्ये वाढीनुसार रोजगार निर्मिती का सुचली नाही ?

देशात पाच राज्यात विधानसभा निवडणुका जाहीर झाल्या आणि याबद्दल आदर्श आचारसंहिता ३ मे पर्यंत आहे.अशा परिस्थितीत सरकारने अचानक विशेष अधिवेशन बोलावून त्यावर महिला आरक्षण, मतदारसंघ पुनर्रचना आणि मतदारसंघ पुनर्रचना आयोग विधेयक यासाठी विशेष अधिवेशन बोलाविण्यात आले होते.परंतू या विशेष अधिवेशनाचा मुख्य उद्देश म्हणजे २० सप्टेंबर २०२३ चे विधेयक बाजूला सारून लोकसभा सदस्यांची संख्या ८५० करने व त्यातून महिलांना ३३ टक्के आरक्षण देणे हा डाव सरकारचा होता.परंतु सरकारचा लोकसभा सदस्य संख्या वाढविण्याचा डाव फसला आणि विधेयक नामंजूर झाले.यामुळे सत्ताधारी पक्ष आगबबुला होवून वाटेल तसे वक्तव्य करतांना दिसतात.विधेयक नामंजूर होताच सरकारची संपूर्ण टीम विरोधाकांवर टीकास्त्र झाडू लागले.यात दिग्गज नेते बोलतांना म्हणतात,विरोधकांनी केली महिला आरक्षणाची भ्रूणहत्या, विरोधकांना पापाची शिक्षा भोगावी लागेल, विरोधकांनी चिरडली महिलांची स्वप्ने, महिलांच्या मार्गात अडथळा अशा प्रकारे अनेक वक्तव्ये सत्ताधारी पक्षाचे नेते करीत आहे व केले सुध्दा. परंतु आश्चर्याची गोष्ट म्हणावी लागेल की, महिला आरक्षणाची एवढीच चिंता सरकारला होती तर,२०२३ मध्ये मंजूर झालेल्या महिला आरक्षण विधेयकाची अंमलबजावणी या विशेष अधिवेशनात का केली नाही? असाही प्रश्न उपस्थित होतो.यावरून स्पष्ट होते की सरकारला ५४३ लोकसभा सदस्यांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण द्यायचेच नव्हते.त्यामुळे सरकारने २०२३ चे विधेयक मोडीत काढून नवीन विधेयक आणल्याचे स्पष्ट झाले आहे.यामध्ये विरोधकांना दोष देणे म्हणजे आपल्याच पायावर कुह्राड मारल्या सारखे होईल.सरकारला महिला आरक्षणाची एवढीच चिंता आणि काळजी होती तर पाच राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत सरकारने आपल्या पक्षाकडून ३३ टक्के महिलांना उमेदवारी का दिली नाही? यावरून स्पष्ट होते की, सरकारने आणलेले महिला आरक्षण विधेयक चुकीच्या पद्धतीने सादर केले आणि याचा अभूतपूर्व धक्का भाजपला बसल्याचे दिसून येते.त्यामुळे दिग्गज नेते आगबबुला होवून वाटेल तसे वक्तव्य करतांना दिसतात.यावरून स्पष्ट होते की, देशात राजकीय पुढारी स्वतःच्या स्वाथार्साठी काहीही करायला तयार असतात ही नुकताच झालेल्या तिन दिवसांच्या विशेष अधिवेशनावरून लक्षात येते.देशात लोकसभेच्या ५४३ सीटा आहेत.या अनुषंगाने महिला विधेयक २० सप्टेंबर २०२३ ला मंजूर झाले. २१ सप्टेंबर २०२३ ला राज्यसभेत मंजूर झाले यानंतर २८ सप्टेंबर २०२३ ला राष्ट्रपतींनी मंजुरी दिली.फक्त अंमलबजावणी करणे बाकी होते, एवढे सर्व झाल्यानंतर आता महिला विधेयक आणण्याची का गरज भासली? या मागचा सरकारचा एकच उद्देश असावा,जर ५४३ लोकसभा सदस्यांमधुन जर ३३ टक्के महिलांना आरक्षण दिले तर राजकीय पुढाऱ्यांचे देउळ पाण्यात जाईल व आपले वर्चस्व कमी होईल आणि आपल्या पायाखालची वाळू हळूहळू घसरू शकते या भितीने संसदेचे विशेष अधिवेशन बोलाविण्यात आले असल्याचे दिसून येते.हे अधिवेशन १६ एप्रिल ते १८ एप्रिल २०२६ दरम्यान बोलाविलेले या विशेष तिन दिवसीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सरकारने महिला आरक्षण, मतदारसंघ पुनर्रचना आणि मतदारसंघ पुनर्रचना आयोग विधेयक सादर केले.यावर मोठ्या प्रमाणात तिन दिवस चर्चा झाली, करोडो रुपयांचा चुराडा झाला व मतदान झालेयात विधेयकाच्या बाजूने कमी मते पडल्याने हे विधेयक नामंजूर झाले.या पार्श्वभूमीवर देशातील सत्ताधारी पक्षाने विरोधकांचे उखाडेपाखाडे काढायला सुरुवात केली.हे विधेयक नामंजूर होताच सत्ताधारी पक्षाचे दिग्गज नेते आपली राजकीय पोळी शेकण्यासाठी मैदानात उतरले आणि याचा फायदा पश्चिम बंगालच्या निवडणुकीत कसा घेता येईल यावर सरकारने जास्त भर दिला. १३१ वे घटनादुरुस्ती विधेयक २०२६ मध्ये एकूण जागांची संख्या वाढवून ८५० करण्याच्या तरतुदींचा समावेश होता. महिला आरक्षणाच्या नावाखाली लोकसभा सदस्याची ५४३ वरून ८५० संख्या करने होता,परंतु याकरिता प्रथम जनगणना होणे गरजेचे असते.परंतु जनगणना झालीच नाही, तर लोकसभा सदस्यांची संख्या कशी काय वाढणार हा ही प्रश्न उपस्थित होतो.देशात लोकसभा सदस्यांची संख्या वाढली तर राज्यसभा सदस्यांची संख्या वाढेल.यानंतर देशातील प्रत्येक राज्यात विधानसभा सदस्यांची संख्या वाढेल, विधानसभा सदस्यांची संख्या वाढली की विधानपरिषदेच्या सदस्यांची संख्या वाढेल.म्हणजे या वाढीव सदस्यांचा अरबो रूपयांचा बोजा देशाच्या १४० कोटी जनतेवर पडेल याचा विचार सरकारने केलाच नाही.माज्या माहितीनुसार देशात लोकसभा सदस्यांची संख्या वाढविण्याची काहीही आवश्यकता नाही. कारण देशात ५४३ लोकसभा खासदार आहेत, त्याचप्रमाणे २४५ राज्यसभा खासदार आहेत.या व्यतीरिक्त देशात प्रत्येक राज्यात विधानसभा आहेत तेथील विधानसभा सदस्य, विधानपरिषद सदस्य आहेत.सोबतच देशाच्या प्रत्येक राज्यांच्या शहरांमध्ये महानगरपालिका आहेत तेथील नगरसेवक, त्याचप्रमाणे देशातील प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा परिषदा आहेत तेथील सदस्य,या व्यतिरिक्त ग्रामपंचायत, नगरपालिका, सरपंच इतर अनेक सदस्य देशाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून जनतेने निवडून दिलेले आहेत.येवढा मोठा फौजफाटा देशसेवेसाठी असतांना खासदारांची संख्या वाढविण्याची सरकारला गरज का पडावी?आज जर देशात खासदारांची संख्या वाढली तर त्यांचा पगार, पेंशन, भत्ते हा खर्च महिन्याला करोडोंनी वाढेल हाच पैसा सरकारने देशाच्या विकासासाठी, बेरोजगारांना रोजगार देण्यासाठी,महागाई कमी करण्यासाठी, शेतकऱ्यांना सुखसुविधा देण्यासाठी केला तर देशाचा विकास झपाट्याने होईल. सरकार म्हणते की, लोकसंख्या वाढीनुसार लोकसभा सदस्यांची संख्या वाढविणे गरजेचे आहे ही बाब ठीक आहे,तर याच अणूषंगाणे सरकारने लोकसंख्येनुसार वाढत्या बेरोजगारीचा विचार का करीत नाही?आज लोकसंख्येच्या तुलनेत देशातील प्रत्येक सरकारी विभागात कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी आहे यामुळे कामामध्ये अनेक अडचणी येत आहेत.याकडे सरकारचे लक्ष नसल्याने देशात बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे, शेतकरी आत्महत्यां करीत आहे याचा विचार सरकार का करीत नाही?आज महागाईने सर्व सिमारेषा ओलांडल्या आहेत त्यावर सरकार नियंत्रण आण्यात अपयशी ठरत आहे. आज देशाच्या एक कोटी ईपीएस -९५ पेन्शन धारक गेल्या १२ वर्षांपासून वाढीव पेन्शनसाठी संघर्ष करीत आहे.वृध्द पेन्शन धारकांना फक्त किमान पेन्शन १००० मिळत आहे, ती कमीत कमी ७५०० करण्यासाठी वृध्द पेंशनधारकांची धडपड सुरू आहे परंतु सरकार याकडे लक्ष देण्यास तयार नाही.त्यामुळे अल्पशा पेंशनमध्ये ईपीएस पेन्शन धारक आज जगुही शकत नाही आणि मरूही शकत नाही अशी गंभीर परिस्थिती देशाच्या वृद्धांची आहे. जेव्हा स्वतःच्या स्वार्थाची गोष्ट आली तेव्हा सरकारने विशेष अधिवेशन बोलावले. परंतु सरकारचा हाही डाव फसला. सर्वप्रथम प्रत्येक राजकीय पक्षाने आपली मानसिकता बनविली पाहिजे की, आपण खरोखरच महिलांच्या आरक्षणाच्या बाजूने आहोत का?याचा पुरेपूर विचार करून प्रथम प्रत्येकांनी (पक्षांनी) आपल्या पक्षामार्फत तत्परता दाखवुन ३३ टक्के किंवा ५० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवारी महिलांना उमेदवारी देऊन नवीन इतिहास घडवायला हवा.नंतर कायद्याच्या चाकोरीतून लोकसभेत विधेयक पारित करण्यासाठी प्रयत्न करावेत. म्हणजेच प्रत्येक पक्षांनी स्वतः पासून सुरूवात करावी नंतर कायद्याच्या किंवा विधेयकाच्या मार्फत बाजू मांडावी असे मला वाटते.जय हिंद.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं. ९९२१६९०७७९, नागपूर.

## सैनिकी मुलांचे वसतिगृहे येथे अशासकीय पदांची भरती

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर यांचे अधिपत्याखालील सैनिकी मुलांचे वसतिगृह, सोलापूर येथे अशासकीय सहाय्यक वसतिगृह अधिक्षकाचे 01 पद भरावयाचे आहे. मानधन रुपये 24875/- प्रतिमहा असेल. उमेदवार हा सैन्यदलातील कमीत कमी हवलदार पदावरुन सेवानिवृत्त असावा. उमेदवारास मराठी व इंग्रजी टंकलेखन संगणक हाताळणीचे ज्ञान असणे आवश्यक आहे. तरी सोलापूर जिल्हयातील माजी सैनिकांनी आपले अर्ज सैनिक सेवेची व इतर शैक्षणिक कागदपत्रे दिनांक 12 मे 2026 पूर्वी या कार्यालयात जमा करावी. त्यानूसार दिनांक 12 मे 2026 (दुपारी 1 वाजता) रोजी मुलाखती घेण्यात येतील. तसेच उमेदवारांनी मुलाखतीस येताना स्वतःची मुळ कागदपत्रे सोबत आणावीत.

तसेच सोलापूर जिल्यातील पात्र व इच्छुक माजी सैनिकांनी याचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

## उभरत्या क्रिकेटचा खेळ आणि आयपीएलची धूम

देसध्याचा आयपीएलचा हंगाम हा खूप जोरात चालू आहे. आशातच क्रिकेटला उभारी देण्याचे काम सर्व स्तरावर होत आहे. अगदी लहानपणापासून मुलांमध्ये आणि मुलींमध्ये क्रिकेट या खेळाचे प्रेम दिसून येत आहे आणि याचा भविष्यामध्ये चांगला परिणाम दिसून येईल अशी आशा केली जात आहे. दिग्गज खेळाडू सध्या आयपीएल मध्ये खेळत आहेत आणि उभरते क्रिकेट खेळाडू सुद्धा आपली जादू दाखवत आहेत. काळानुसार क्रिकेट खेळ बदलत गेला अगदी पूर्वीपासून आजचा काळपर्यंत अनेक बदल या क्रिकेट विश्वाने पाहिले आहे. नाविन्यपूर्ण खेळाडू, नवीन नियम, अनेक चाहते, नवीन नवीन जागा, स्टेडियम आणि खेळाबद्दलचा जोश दिसून आला आहे. आयपीएल म्हणलं की क्रिकेट बरोबरच अनेक गोष्टींचा संबंध येतो. जसे की मेट्रो शहर, स्टेडियम, हॉटेल, रेस्टॉरंट, वाहतूक, पार्किंग, विमानसेवा, दिवा बतीची सोय आणि इतर लागणाऱ्या गोष्टी ज्या स्टेडियम मध्ये मिळतात. या गोष्टींमुळे अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणावर चालना मिळत आहे. क्रिकेट हा नुसता खेळ नसून आपल्या देशाचा एक प्रेमाचा प्रतीक बनले आहे. पूर्ण विश्वामध्ये भारतीय म्हणलं की क्रिकेट प्रेमी हे म्हणले जाते. आज अनेक खेळाडू लहानपणापासून कष्ट करत पुढे सरकण्याचा प्रयत्न करत आहेत. यामध्ये स्पर्धा खूप आहे. स्पर्धात्मक युगामध्ये क्रिकेटर बनने हे एक आयकॉनिक झाले आहे आणि त्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणारे मुले आणि मुली सहज आपल्याला मैदानवर दिसून येतात. सर्व खेळाडू सर्वतोपरी प्रयत्न करत आपल्यामधील कौशल्य दाखवत एक उंच शिखर गाठण्याचा प्रयत्न करत आहे. अशातच पूवीर्चे जे खेळाडू होते, यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपण काही नावीन्य करता येईल का ? हे उभरते खेळाडू विचार करत असतात. क्रिकेट खेळाचा खूप मोठा चाहता वर्ग आज दिसत आहे. आपल्या आवडत्या खेळाडूला पाहण्यासाठी तसेच मैदानामध्ये जाऊन सामना पाहण्यासाठी जनता कष्ट घेत आहे, आणि त्यातून आनंद मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. खरं तर क्रिकेट पाहण्याचा अनुभव करण्याची आगळीवेगळी मेजवानीच आहे. या आयपीएल मध्ये अर्थव्यवस्थेला चालना मिळण्याचे काम होत आहे. जी की एक चांगली बाब असून मनोरंजनाबरोबर क्रिकेटचा आनंदही लुटता येईल, असे इथे जाणवत आहे. त्यामुळे आयपीएल सारख्या स्पर्धेला उभारी मिळणे आणि उत्स्फूर्तपणे त्याचा आनंद घेणे, हे अनुभव जनतेला घ्यायचे आहेत. या आयपीएल मध्ये अनेक लोक काम करतात आणि क्रिकेटमुळे अनेक लोकांना रोजगार निर्मिती झाली आहे. प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष असे अनेक फायदे करून देणारे क्रिकेट खेळ भारतामध्ये उभारी देत आहे आणि याच खेळाला भारतातच नव्हे तर पूर्ण जगामध्ये एक उत्तम असा अनुभव देणारा खेळ म्हणून ओळख मिळत आहे. इथे प्रत्येक शहराला आयपीएलचे सामने मिळावे असे वाटत आहे, त्यासाठी या स्पधेर्चे विस्तारीकरण होईल का ? याचा प्रयत्न सर्व करत असतात. नाविन्यपूर्ण खेळाडू निर्माण करण्यासाठी जिल्हास्तरावर आणि राज्यस्तरावर प्रयत्न चालू असतात. याचा सकारात्मक परिणाम म्हणजे अनेक क्रिकेट स्पर्धेमध्ये भारताने विजय मिळवला आहे. यापुढेही भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय खेळाडू उत्तम कामगिरी करत राहतील अशी आशा क्रिकेटच्या चाहत्यांना आहे. त्यामुळे मानवाच्या आयुष्यामध्ये क्रिकेट खेळाला पण महत्त्व प्राप्त झाले आहे आणि आयपीएल सारखी स्पर्धा यावर खरी उतरते हे मात्र नक्की आहे.



**ऋत्विज चव्हाण**
मो 8380800083

## सांगोल्यात ट्रामा सेंटर रखडले; सुरू न झाल्यास आंदोलनाचा इशारा

**सांगोला (कटूसत्य वृत्त):** तालुक्यातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेले ट्रामा सेंटर अद्याप सुरू न झाल्याने संताप व्यक्त केला जात आहे. चार वर्षांपूर्वी सुमारे दहा कोटी रुपये खर्च करून उभारण्यात आलेली ही इमारत सध्या वापराअभावी धूळखात पडली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने दोन वेळा रंगकाम करूनही उद्घाटनाचा मुहूर्त लागत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढली आहे.

यासंदर्भात सांगोला शहर संघर्ष समितीचे अध्यक्ष नागेश जोशी यांनी तीव्र भूमिका घेत, येत्या दोन महिन्यांत ट्रामा सेंटर सुरू न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

सांगोला तालुक्यातून नागपूर-रत्नागिरी, इंदापूर, अकलूज, विजयपूर तसेच चेन्नई, कोल्हापूर, पंढरपूर आणि औरंगाबाद या प्रमुख मार्गांचा वाहतूक प्रवाह मोठ्या प्रमाणावर होतो. रस्त्यांची सुधारणा आणि वेगमयार्दा वाढल्याने अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. अशा परिस्थितीत गंभीर जखमींना उपचारासाठी सुमारे १०० किलोमीटर अंतरावरील मिरज किंवा सोलापूर येथे हलवावे लागते, ज्यामुळे अनेकदा जीवितहानीची शक्यता वाढते.

हीच गरज लक्षात घेऊन सांगोल्यात ट्रामा सेंटर मंजूर करण्यात आले होते. इमारत पूर्ण होऊनही ते कार्यान्वित न झाल्याने प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. माजी आमदार शहाजी पाटील यांनी याच्या उद्घाटनासाठी प्रयत्न केले होते. सध्या आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी आवश्यक वैद्यकीय उपकरणे व पदभरतीसाठी पुढाकार घेऊन ट्रामा सेंटर तातडीने सुरू करावे, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

दरम्यान, प्रशासनाने लवकरात लवकर ठोस निर्णय घेऊन ट्रामा सेंटर सुरू करावे, अन्यथा संघर्ष समितीच्या आंदोलनाला सामोरे जावे लागेल, असा इशारा देण्यात आला आहे.

## सोलापूर ग्रामीण भागात अवकाळीचा तडाखा

### महावितरणच्या 'अतिदक्षते'मुळे नागरिकांचे हाल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातगेल्या काही दिवसापासून अवकाळी पाऊस सुरु आहे. या पावसामुळे सातत्याने वीजपुरवठा खंडित होत आहे.

यामुळे पिण्याच्या पाणीपुरवठा व दळणावर विपरीत परिणाम होत आहे. ऐन उन्हाळयात विजेअभावी ग्रामीण भागातील नागरिकांचे हाल होत आहेत.

सोलापूर जिल्ह्यात मागील वर्षी ५मे पासून अवकाळी पाऊस सुरु झाला होता. यंदा ५ एप्रिल पासून सातत्याने अवकाळी पाऊस सुरु आहे. वादळी वारा अन विजांच्या कडकडाट होत खबरदारी घेत असल्याने

या महावितरणकडून वीजपुरवठा खंडित होत आहे. काळात मागील आठवड्यात सलग चार दिवस रात्री अवकाळी पाऊस पडला. या पावसामुळे वीजपुरवठा रात्रभर खंडित होता. वीजपुरवठा १४ न तासापेक्षाही जास्त काळ खंडित झाल्याने या काळात अनेक गावातील पाणीपुरवठा योजनेवर परिणाम झाला. झ्र विजेअभावी पाणीपुरवठा योजना विस्कळीत झाल्याने महिला व मुलांनामिळेल त्या ठिकाणाहून पाणी आणण्याची नामुष्की ओढावली. विजेअभावी अनेक गावातील पिठाच्या गिरणीही बंद होत्या. त्यामुळे मागील काही दिवसात अनेक ठिकाणी गहू व ज्वारीचे दळण होणे बंद पडले.

त्यामुळेमहावितरणकडून दक्षतेचा अतिरेकअवकाळी वादळी वारा सुरु झाला की



लगेच महावितरणकडून वीजपुरवठा खंडित करण्यात येतो. प्रतिबंधात्मक उपाय योजनेचा हा भाग असला तरी वादळी वारा थांबल्यानंतरही वीजपुरवठा अनेक तास खंडित असतो. त्यामुळे अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. महावितरणने काळजी घ्यावी, मात्र त्याचा अतिरेक करु नये सचिन शेळगे, बोरामणीअनेक महिलांना पिठासाठी शेजारणीकडे उधारवारी करावी लागली. एकीकडे रोजच सोलापूरचे तापमान वाढत आहे. अशात ग्रामीण भागात सातत्याने वीज पुरवठा खंडित होत असल्याने उष्ण दाहकतेने त्रस्त झालेल्या नागरिकांच्या समस्या आणखीनच वाढत आहे.

शेतातपिकांना पाणी देण्यासाठी गेलो तर वीज नाही, अन गावात घरी आलो की वीज नाही अशी अवस्था ग्रामीण भागात सध्या अनुभवास येत आहे. विजेअभावी घरातील टीव्ही, कुलर, पंखाडी बंद असल्याने अनेकांना ऐन उन्हाळयात घराबाहेर सक्तीने बाहेर पडण्याची वेळ आली आहे.

## लाईव्ह इव्हेंट्स परवानगीसाठी 'एक खिडकी' सुविधा

### राज्य शासनाचा महत्त्वपूर्ण निर्णय

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्यातील लाईव्ह मनोरंजन क्षेत्राला चालना देण्यासाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. लाईव्ह इव्हेंट्स परवानगीसाठी 'एक खिडकी' सुविधा निर्माण करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. यासंदभार्तील सर्वसमावेशक कार्यपद्धतीसह(एसओपी) संपूर्ण कार्यान्वयासाठी समन्वय संस्था (नोडल एजन्सी) म्हणून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय कार्य करणार आहे. याबाबतचा शासन निर्णय नुकताच जारी करण्यात आला आहे.

लाईव्ह इव्हेंट्स, कॉन्सर्ट आणि विविध कार्यक्रमांच्या आयोजनासाठी लागणाऱ्या अनेक परवानग्या सुलभ करण्याच्या उद्देशाने 'एक खिडकी सुविधा' सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सद्यस्थितीत कोणताही मोठा कार्यक्रम आयोजित करताना आयोजकांना पोलीस, अग्निशमन, वीज, महापालिका, महसूल, पर्यावरण आदी विविध विभागांकडून स्वतंत्र परवानग्या घ्याव्या लागतात. या प्रक्रियेत अधिकचा वेळ लागत असून अनेक प्रकारची कागदपत्रे लागत आहेत. वेळ आणि कागदपत्रांची संख्या कमी करून संपूर्ण प्रक्रियेत एकसूत्रता आणण्यात येणार आहे. या अनुषंगाने राज्यात प्रमाणित कार्यपद्धती तयार करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या अध्यक्षपदी प्रधान सचिव (माहिती व जनसंपर्क) असणार असून, पोलीस, वाहतूक, महानगरपालिका, अग्निशमन, वीज, आरोग्य, पर्यावरण तसेच इतर संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी सदस्य असतील.

## ट्रॅक्टर उलटून 32 वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** माळशिरस तालुक्यातील बागेचीवाडी येथील संतोष आबा धाईजे (वय 32) यांचा ट्रॅक्टर अंगावर पडून दुदैर्वी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संतोष धाईजे हे पाटील वस्ती येथील 'भाग्यश्री तू या' हॉटेलमध्ये काम करत होते. शनिवार दिनांक 18 एप्रिल रोजी ते नेहमीप्रमाणे कामावर गेले नव्हते. त्याच दिवशी सचिन शिंदे राहणार बागेचीवाडी यांनी सोनालिका कंपनीचा ट्रॅक्टर संतोष यांना चालवण्यासाठी दिला होता.

संतोष हे शेतातील तालीवरून ट्रॅक्टर चालवत असताना अचानक तोल जाऊन ट्रॅक्टर उलटला. या



अपघातात ट्रॅक्टर त्यांच्या अंगावर पडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटना अत्यंत दुदैर्वी असून अचानक घडलेल्या या प्रसंगाने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मृत संतोष धाईजे यांच्या पश्चात दोन महिन्यांपूर्वीच बायपास शस्त्रक्रिया झालेली आई, पत्नी आणि दोन लहान मुली असा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे गावात व परिसरात शोक व्यक्त केला जात आहे.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादक: श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालय: एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादक: पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादक: सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागार: ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# लाडक्या बहिणीला पैसे नको दररोज पाणी द्या



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर मध्ये विविध कामानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सोलापूर दौऱ्यावर आले असताना संभाजी ब्रिगेडच्या महिला आघाडीच्या वतीने जिल्हाध्यक्ष मीनल दास यांच्या नेतृत्वाखाली आसरा चौकामध्ये मुख्यमंत्र्याना पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नावर लक्ष वेधण्यासाठी घागरी घेऊन आसरा चौकात निदर्शने करण्यात येणार होते तत्पूर्वी पोलिस स्टेशन च्या पोलिसांनी काही कामानिमित्ताने अक्कलकोट येथे गेलेल्या जिल्हाध्यक्ष मिनल दास,सरोजिनी माकाई, अनिता वाघमारे, शकुंतला माकाई,जयश्री रानसरजे यांना अक्कलकोट दक्षिण पोलीस स्टेशन येथे जाऊन ताब्यात घेतले.

विजापूर नगर पोलीस स्टेशन येथे संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम यांना सकाळीच डिटेक्ट करण्यात आले होते.

सोलापूर शहराला गेल्या अनेक वर्षापासून सात आठ दिवसाआड पाणी मिळते आणि तेही रात्री उशिराने पाणीपुरवठा केला जातो त्यामुळे एक तर सोलापूरतील श्रमजीवी कष्टकरी मध्यमवर्गीय नागरिक काम धंदा करून थकून येतात आणि त्यात रात्री अकरा बारा वाजता पाणी सोडले जाते त्या जागरणामुळे अनेक महिला आजारी पडत आहेत महाराष्ट्र शासन जी लाडकी बहिणीसाठी पंधराशे रुपये देते ते आरोग्यासाठी दवाखान्यातच खर्च होत आहेत त्यामुळे देवा भाऊ आम्हाला लाडकी बहिणीचे पैसे नको दररोज पाणी द्या या मागणीसाठी संभाजी ब्रिगेड महिला आघाडीच्या वतीने आसरा चौकात निदर्शने करण्यात येणार होते पण एमआयडीसी पोलिसांनी अक्कलकोट येथे लोकेशन ट्रेस करत त्यांना अक्कलकोट दक्षिण पोलीस स्टेशन येथे नजरकैद करून ठेवले.

# जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांचा मुख्य सचिव यांचे हस्ते सन्मान



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त कार्यालय,आपली सेवा आमचे कर्तव्य या उपक्रम या अंतर्गत संभाजीनगर चे तत्कालीन जिल्हाधिकारी तथा राज्य बियाणे महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक दिलीप स्वामी यांचा मुंबई येथील सह्याद्री अतिथिगृहात मुख्य सचिव राजेश आग्रवाल यांचे हस्ते सन्मान करणेत आला., महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाचे सचिव अतुल घाटगे यांचे अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम घेणेत आला.

सेवा हक्क अधिनियम ९१ टक्के सेवा कालमयार्देत देऊन उच्चांक केल्याबद्दल तसेच अधिनियम अंतर्गत अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम जिल्ह्यात यशस्वी राबविल्याबद्दल स्वामी यांचा स्वामी करणेत आला.

दिलीप स्वामी हे जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर या पदावर कार्यरत असताना, महाराष्ट्र राज्य सेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वर्ष २०२५-२६ मध्ये " महाराष्ट्र राज्य सेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित सेवांसाठी प्राप्त अजार्पैकी ९० टक्क्यांपेक्षा अधिक अजार्चा विहीत कालावधीत निपटारा केले बद्दल जिल्हाधिकारी स्वामी यांचा गौरव करणेत येणार आहे. या उपक्रमाद्वारे आपण हा संपूर्ण राज्यासाठी एक आदर्श प्रस्तापित केला आहे. यास्तव राज्यातील सर्व जिल्हाधिकारी यांना प्रेरणा मिळण्याचे हेतुने दि.२८.०४.२०२६ रोजी दुपारी ११.०० वा. सह्याद्री अतिथीगृह येथील सभागृहात आयोजित सोहळयात महाराष्ट्र शासनाचे मुख्य सचिव यांच्या शुभ हस्ते यथोचित सन्मान करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाच्या सचिव वैशाली राज चव्हाण (निर्धार) यांनी दिलीप स्वामी यांना उपस्थित राहणे बाबत लेखी कळविले आहे.

**सेवा हक्क अभियानात प्रत्येकाचा सहभाग - दिलीप स्वामी**

छत्रपती संभाजी नगर चे जिल्हाधिकारी पदावर कार्यरत असताना या अभियानाची विशेष अंमलबजावणी केली. या मध्ये सर्व महसुल विभागातील कर्मचारी यांचा योगदान आहे. लोकांना चांगल्या सेवा देणे क्रमप्राप्त आहे. भविष्यात याची सर्वांनी दखल घेणे आवश्यक आहे. चांगले काम करूनही नैराश्य येते. परंतू या सेवा हक्क अभियाना मुळे शासनाची प्रतिमा देखील उंचावणेस मदत झाली आहे. असेही व्यवस्थापकीय संचालक दिलीप स्वामी यांनी सांगितले.

# शाळेतील बेकायदेशीर वसुली रोखण्यासाठी धडक कारवाई करावी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील काही शाळा, विद्यालय व महाविद्यालयात शाळेचा दाखला देताना, व शाळा प्रवेशासाठी मोठी रक्कम मागण्याचा प्रकार घडत असतो अश्यामुळे विध्यार्थी आणि पालकांना वेठीस धरण्याचा हा प्रकार रोखण्याकरिता शासनाने धडक कारवाई भरारी पथकाची नियुक्ती करून हे बेकायदेशीर प्रकार थांबवावा अश्या मागणीचे लेखी निवेदन स्वराज्य माहिती अधिकार संघटना सोलापूर जिल्ह्याच्या वतीने माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांना देण्यात आले आहे.

स्वराज्य पोलीस मित्र, पत्रकार संरक्षण आणि माहिती अधिकार संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष दिपकजी कांबळे, संस्थापक तथा राष्ट्रीय मुख्य महासचिव कमलेशजी शेवाळे, विश्वस्त तथा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षा सौ. धनश्रीताई उत्पात यांच्या आदेशानुसार व विश्वस्त तथा महाराष्ट्र राज्य प्रसिद्दी प्रमुख उमेश काशीकर व सर्व विश्वस्त आणि सर्व संचालक यांच्या मार्गदर्शनाखाली, सोलापूर जिल्हा अध्यक्ष चंद्रकांत दादा वेदपाठक यांच्या नेतृत्वाखाली शिक्षणाधिकारी जगताप यांना हे निवेदन देण्यात आले.

महाराष्ट्र दिनी 1 मे रोजी राज्यात सर्व शाळेत सर्वत्र परीक्षेचा निकाल देण्यात येतो.नेमके या "दिवशी शाळा सोडण्याचा दाखला, मार्कलिस्ट देताना काही शाळा विद्यालय, महाविद्यालयात बेकायदेशीर वसुली केली जाते, त्यानंतर नवीन वर्षात शाळा प्रवेशाच्या वेळी काही शाळा व विद्यालये बांधकाम निधी, विकास निधीच्या नावाखाली काही पालकांकडून मोठी रक्कम वसुल केले जातात तसेच शालेय साहित्य व गणवेश शाळेच्या भांडारातूनच घ्यावे अथवा ठराविक दुकानातूनच घ्यावेत अशी सक्ती केली जाते " अश्या अनेक तक्रारी स्वराज्य कडे आले आहेत. त्या अनुषंगाने स्वराज्य माहिती अधिकार संघटना विध्यार्थाच्या व पालकांच्या हितासाठी ही चळवळ हाती घेतले असून वरील बेकायदेशीर प्रकार रोखण्याकरिता जिल्ह्यात धडक कारवाई भरारी पथक नेमन्यात यावे आणि ज्या ठिकाणी असे प्रकार आढळून येतात त्या शाळेवर कारवाई करत परवाना रद्द करावा अश्या मागणीचे लेखी निवेदन सोलापूर जिल्हा माध्यमिक शाळेचे शिखणाधिकारी सचिन जगताप यांना स्वराज्य चे सोलापूर जिल्हा अध्यक्ष चंद्रकांत दादा वेदपाठक यांनी दिले आहेत या प्रसंगी कार्याध्यक्ष सुनिल पंडित, उपाध्यक्ष राजेंद्रकुमार रघोजी, सचिव सुधाकर शहाणे, सहसचिव दत्तगुरु वेदपाठक, सहसचिव दिपक कुरुलकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# अकलूज येथील रोजगार मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील आणि खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शिवरत्न शिक्षण संस्था आणि श्री शिवपार्वती सार्वजनिक विकास ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने अकलूज येथील शिवरत्न नॉलेज सिटीमध्ये भव्य रोजगार मेळावा उत्साहात पार पडला.मेळाव्याचे उद्घाटन शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा शितलदेवी मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.या मेळाव्यास सोलापूर जिल्ह्यासह माढा लोकसभा मतदारसंघातील विविध गावांमधून मोठ्या संख्येने युवक-युवतींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या रोजगार मेळाव्यात एकूण युवक-युवतींनी सहभाग नोंदवून विविध नामांकित कंपन्यांतील रोजगाराच्या संधींचा लाभ घेतला. जवळपास २३ प्रतिष्ठित कंपन्यांनी या मेळाव्यात सहभाग घेतला होता.

यामध्ये भारत फोर्ज, बारामती; डार्कटेक प्रा. लि., पुणे; क्यूडटास टेक्नॉलॉजी, पुणे; इक्विटास बँक, अकलूज; आयडीएफसी बँक, अकलूज; पियाजिओ व्हेईकल्स प्रा. लि., बारामती; कॉटनकिंग, बारामती; धनस्मृती टेक्सटाइल्स प्रा. लि., झरे (करमाळा); नेक्सा मारुती सुझुकी, अकलूज; शिवामृत दूध उत्पादक सहकारी संघ, विजोरी; शिवशंकर बाजार, अकलूज; यश सुझुकी, अकलूज; मेडिकल सेक्टर, अकलूज; एनआरपी कन्सल्टंट्स, पुणे; बीगॉस प्रा. लि.; वीटेक कन्सल्टंट्स प्रा. लि. आदी कंपन्यांचा समावेश होता.

यावेळी शिवरत्न शिक्षण संस्थेचे सचिव धर्मराज दगडे, कु इशिता मोहिते पाटील,इतर सर्व संचालक यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील आणि खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेला हा सामाजिक उपक्रम विशेष ठरला. युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत त्यांना योग्य दिशा देण्याचा हा प्रयत्न अत्यंत स्तुत्य असल्याचे उपस्थित मान्यवरांनी नमूद केले. दोन्ही संस्थांनी सामाजिक बांधिलकी जपत तरुण पिढीच्या भविष्याचा विचार करून घेतलेला हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# साहित्यरत्न कॉ. अण्णाभाऊ साठे गुणवंत कामगार पुरस्कार' वितरण कार्यक्रमाचे आयोजन




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शुक्रवार १ मे ,महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील व कामगार चळवळीतील अग्रणी नेते साहित्यरत्न कॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या नावाने क्रांतीवीर लहुजी शक्ती सेना,महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने 'गुणवंत कामगार पुरस्कार ' वितरण कार्यक्रमाचे आयोजन साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक ,सोलापूर येथे सकाळी 9:30 वाजता करण्यात आले आहे. सोलापूर शहराचे महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणाऱ्या या कार्यक्रमास आयुक्त सचिन ओंबासे, भाजपा गटनेते नरेंद्र काळे नगरसेवक समाधान आवळे, श्रीदेवी फुलारे, विनोद भोसले, चेतन नरोटे,आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

कार्यक्रमाचे आयोजक क्रांतिवीर लहुजी शक्ती सेनेचे प्रदेशाध्यक्ष सुरेश पाटोळे यांनी सांगितले की,थोर साहित्यिक, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील योगदान शाहिरी, पोवाडे आणि लोकगीतांच्या माध्यमातून जनमानस तयार करणे व चळवळीत लोकसहभाग वाढवणे या अंगाने महत्वपूर्ण आहे. त्याचबरोबर १मे हा 'जागतिक कामगार दिन' देखील आहे. अण्णाभाऊ स्वतः एक गिरणी कामगार होते.त्यांनी स्वतःला कामगार चळवळीत झोकून दिले होते. 'पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरली नसून, दलित व कामगारांच्या तळहातावर तरली आहे.' असे सांगून त्यांनी कामगारांच्या श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिली आहे.१९३८ ते १९४४ पर्यंत गिरण गावातील कामगारांच्या प्रत्येक लढ्यात, आंदोलनात, संघर्षात ते सामील होते.१९४४ मध्ये 'लाल बावटा कलापथकाची' स्थापनेमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांचे साहित्यातील योगदान, कामगार चळवळ व संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील सक्रिय सहभाग याचे विस्मरण नवीन पिढीला होऊ नये म्हणून दरवर्षी क्रांतिवीर लहुजी शक्ती सेना,महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने एक मे या दिवशी अण्णाभाऊंच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन कार्यक्रम आणि गुणवंत कामगार पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले जाते.या कार्यक्रमाचे हे १४ वे वर्ष आहे. संघटित व असंघटित क्षेत्रातील निवडक गुणवंत कामगारांना दरवर्षीप्रमाणे याही वर्षी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे गुणवंत कामगार पुरस्कार २०२६ मान्यवरांच्या हस्ते देण्यात येणार आहे.पुरस्काराचे स्वरूप शाल, श्रीफळ, फेटा व स्मृतिचिन्ह असे राहणार आहे. तरी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आम्ही करत आहोत.

# शरदचंद्र पवार महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी मधुकर पवार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** येथील शरदचंद्र पवार वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी मधुकर पवार यांची निवड करण्यात आली आहे. प्राचार्य डॉ पवार हे छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज मध्ये मराठी विभाग प्रमुख महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य म्हणून काम केले आहे. आता त्यांची शरदचंद्र पवार महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी निवड करण्यात आले आहे. या निवडीबद्दल त्यांच्या संस्थेचे अध्यक्ष माजी महापौर मनोहर सपाटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक तानाजी माने, संस्थेचे संचालक ज्ञानेश्वर सपाटे, सोलापूर जिल्हा कॉलेज कर्मचारी युनियनचे अध्यक्ष दत्ता भोसले, यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**CHANGE IN NAME**

I am changing my name from **NARAYAN SHANKAR HAKKE** To **NARAYAN SHANKAR HAKE** for passport issuance.

# ज्ञानाला भाषेचं बंधन नसतं - आयपीएस डॉ. महेश भागवत



**पिंपरी, (कटूसत्य वृत्त):-** स्पर्धा परीक्षांची तयारी करत असताना चालू घडामोडींची माहिती ठेवण्यासाठी दररोज काटेकोरपणे वृत्तपत्र वाचन करण्याची गरज आहे. तसेच शैक्षणिक अभ्यास आणि अवांतर वाचन सातत्याने सुरु ठेवावे. मी मराठी वाङ्मय आणि इतिहास हा विषय घेऊन यूपीएससी ची परीक्षा उत्तीर्ण झालो. ज्ञानाला भाषेचं बंधन नसतं हे माझे स्पष्ट मत आहे. जर स्पर्धा परीक्षेत अपयश आले तर आपल्याकडे प्लॅन बी तयार असला पाहिजे असे मार्गदर्शन तेलंगणाचे अतिरिक्त पोलीस महासंचालक डॉ. महेश भागवत यांनी पीसीसीओई मध्ये विद्यार्थ्यांशी संवाद साधताना केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग मध्ये डॉ. महेश भागवत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह देऊन भागवत यांचे स्वागत केले. यावेळी उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे व अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, प्राचार्य डॉ. गोविंद कुलकर्णी, पीसीयू नियामक मंडळ सदस्य सचिन इटकर, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता डॉ. शितल कुमार रवंदळे आदी उपस्थित होते.

डॉ. महेश भागवत यांनी सांगितले की, नागरिकांना पोलिसांकडून खूप अपेक्षा आहेत. परंतु पोलीस यंत्रणेवर देखील खूप कामाचा ताण आहे. सध्या पोलिसांकडे २५ टक्के गुन्हे हे सायबर क्राईमचे नोंद होत आहेत. या विषयी नागरिकांमध्ये जागृती होणे गरजेचे आहे. आपल्या परिसरातील जागरूक नागरिकांनी पोलिस मित्र म्हणून काम करावे असे आवाहन डॉ. भागवत यांनी केले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांनी सांगितले की, डॉ. महेश भागवत हे १९९५ मध्ये दुसऱ्या प्रयत्नात आयपीएस परीक्षा उत्तीर्ण होऊन देशसेवेसाठी रुजू झाले. त्यांनी नक्षलवाद्यांचं पुनर्वसन, मानवी तस्करी रोखणे, त्यांचं पुनर्वसन करणे, बाल मजुरांची सुटका करून त्यांच्यासाठी शाळा सुरु करणे, सायबर क्राईम सारख्या गुन्ह्यांचा कार्यक्षम तपास करणे अशा अनेक जबाबदाऱ्या पूर्ण केल्या आहेत. भारतीय प्रशासनामध्ये सामाजिक भान असलेला संवेदनशील, कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे याचा अभिमान वाटतो असेही ज्ञानेश्वर लांडगे यांनी डॉ. भागवत यांचा सत्कार करताना सांगितले. प्रास्ताविक डॉ. गिरीश देसाई, सूत्र संचालन माधुरी ढमाले यांनी मानले. समारोप सत्रात पीसीईटीच्या इन्फिनिटी कम्युनिटी रेडिओला भेट देऊन डॉ. भागवत यांनी श्रोत्यांशीहि मनमोकळा संवाद साधला.

## Classified - छोटी जाहिरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

**बोअरवेल**

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**पाहिजेत**

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

**वर-वधू**



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**


सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**

मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) एकवीस दुणे
२) लिंबू पाण्याचे पेय ३) कजरा उलट लिहा ४) तय उलट लिहा
५) कोकणातील एक स्ट्राँग नेते
६) परंतु (हिंदीत) ७) पत्र (इंग्रजीत)
१०) ग्रॅज्युएट (मराठीत)
१२) थंड, शीत १५) ॲडव्होकेट (मराठीत)
१६) राजाबाबू चित्रपटातील गोविंदाचा पालक असलेला अभिनेता १७) बारा वर्षांचा काळ १९) एक फळ २०) देखणा, रूबाबदार व्यक्तिमत्त्व २१) फेब्रुवारी (हिंदीत) २३) सहा उलट लिहा
२५) झी टीव्हीवरील विनोदी मालिका-चला ** येऊ द्या २६) कॉलनी (मराठीत) २७) वडिलोपार्जित असलेला संपत्तीचा हक्क
३०) याचे कणीस भाजून खातात
३१) उत्सवाचा दिवस
३३) वस्तूची विक्री ३४) हिंदी सिनेसृष्टीतील एक अभिनेता, दीपिकाचा पती-**** सिंह ३५) दैत्य, दानव ३६) राखण, एकनाथ खडसेंच्या सून-** खडसे ३८) रोख
४१) वाट, मार्ग (हिंदीत)
४३) उदार मनाने देणे, ** करणे

**आडवे शब्द :**
१) बिहारमधील एक प्रख्यात जिल्हा व लोकसभा मतदारसंघ
५) महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष
८) चांदी ९) बस अथवा ट्रकच्या केबिनचे छत
११) बगळा १२) गाणे गाणारा १३) दात, दंत
१४) नवऱ्याची दुसरी बायको १६) सबब, निमित्त
१८) शरीर (हिंदीत) १९) गुन्हा २१) सब्र का ** मिठा होता है
२२) एक भारतीय फलंदाज-अजिंक्य *** २४) तरचा साथीदार
२५) निश्चित, खात्रीशीर २६) श्रीरामाने चौदा वर्षे भोगला तो
२८) जंगल अथवा डोंगराला लागलेली आग २९) माहेरच्या विरूध्दार्थी शब्द
३१) सल्ला (हिंदीत) ३२) शुगर (मराठीत)
३५) पॉलिटिक्स (मराठीत) ३७) शरीर, काया ३९) परंतु, शर्थ
४०) चित्त, ध्यान, लाख
४२) हनुमानाच्या हातातील शस्त्र
४४) दहा गुणिले सात
४५) पुणे लगतचा एक जिल्हा

## सुडोकु - 237

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 2 | | | 4 | | | 6 | |
| | | 1 | 6 | | | 8 | 9 | |
| | | 9 | 8 | 3 | 1 | 5 | | 7 |
| 4 | 9 | | 1 | 5 | 7 | | | |
| | | | | | | | | |
| | 5 | 3 | | | 4 | | | |
| 9 | 6 | | 4 | 1 | 5 | | | 8 |
| 1 | | | 7 | 6 | 3 | 2 | | |
| 3 | | | | 2 | 8 | | 5 | 1 |

# सोलापूरच्या गारमेंटला ग्लोबल मार्केट मिळवून देण्यासाठी सहकार्य करणार - मुख्यमंत्री फडणवीस

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सतत नऊ वर्षे युनिफॉर्म गारमेंट एक्जीबिशन भरवून सोलापूरचे नाव देशभर पोहोचविला त्या सोलापूरच्या युनिफॉर्म गारमेंट असोसिएशन ला साता समुद्रापार असलेल्या दुबई येथे गारमेंट प्रदर्शन भरविण्या करिता सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे ठोस आश्वासन कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं.

सोलापूर जिल्ह्यात भाजपला मिळालेल्या घवघवीत यशाची कृतज्ञता व्यक्त करण्या साठी हरिभाई शाळेच्या प्रांगणात आयोजित करण्यात आलेल्या मेळाव्यात ते बोलत होते.

सोलापूर युनिफॉर्म गारमेंट असोशियन ने दुबई येथे युनिफॉर्म गारमेंट प्रदर्शन भरविणे तसेच सोलापूरला एक अत्याधुनिक गारमेंट पार्कची उभारणी करणे तसेच सर्व शिक्षा अभियानांतर्गत जिल्हा परिषदेमार्फतच गणवेश पुरविण्याचे काम स्थानिक पातळीवर व्हावे या तीन प्रमुख मागण्या करिता सोलापूर गारमेंट मॅन्युफॅक्चर असोसिएशन ने भाजपाचे ज्येष्ठ आमदार सुभाष देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक घेतली आणि तशा आशयाचे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आले होते.

आता मिळालेले हे ठोस आश्वासन केवळ आमदार सुभाष देशमुख यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळेच अशी कर्तज्ञता असोसिएशन ने व्यक्त केली.

सतत नऊ वेळा भरविण्यात आलेल्या देशांतर्गत युनिफॉर्म गारमेंट एक्जिबिशन ला प्रचंड प्रतिसाद मिळाले आहे. युनिफॉर्म गारमेंट चे मार्केटिंग देशाबाहेर होणे गरजेचे असल्याचे मत माननीय आमदार सुभाष देशमुख यांनी मुख्यमंत्र्यांसमोर व्यक्त केली होती.

केवळ भाजपा शासनाच्या पॉलिसीमुळेच जिल्हा परिषदेच्या शालेय समिती मार्फतच गणवेश पुरवायचे किंवा वितरण करावे या सरकारने घेतलेल्या निर्णयामुळे सोलापूरला मोठ्या प्रमाणात रोजगाराची संधी उपलब्ध झाली.

यापूर्वी युनिफॉर्म गारमेंट असोसिएशनने सोलापूर सह मुंबई, हैदराबाद, बेंगलोर, वाराणसी अशा विविध मेट्रो सिटी मध्ये आपले युनिफॉर्म गारमेंट प्रदर्शन यशस्वीरित्या राबविले होते. त्याचेच परिणाम म्हणून गारमेंट असोसिएशनने आ. सुभाष बापू देशमुख यांच्याकडे देशाबाहेर प्रदर्शन भरविण्याची योजना मांडली होती.

आमदार देशमुख यांनी वारंवार प्रयत्न करून कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर हा विषय मांडला होता. त्याचेच परिणाम म्हणून की काय आज मुख्यमंत्र्यांनी युनिफॉर्म गारमेंट वितरण तसेच अत्याधुनिक गारमेंट पार्क आणि दुबईतील प्रदर्शन या तिन्ही मागण्या त्यांनी मान्य केले आहेत.



मुख्यमंत्र्यांनी विमान सेवा सुरू करण्याची घोषणा केली ती सुरू करण्यात आली आयटी कंपन्यांची घोषणा केली त्याकरिता आत्ता नुकतेच जमिनीचे हस्तांतरण केलेले आहे. सोलापूर आता ग्लोबल मार्केटिंग कडे वळत असल्याने गारमेंट असोशियन ने आता दुबई येथे युनिफॉर्म गारमेंट एक्जीबिशन भरविण्या करिता व रेडीमेड गारमेंट पार्क बनविण्याकरिता महाराष्ट्र शासन सर्वतोपरी सहकार्य करेल असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

# आ.मोहिते पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिर

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** समाजसेवेचा एक महत्त्वपूर्ण उपक्रम म्हणून अकलूज येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या उपक्रमामुळे परिसरातील गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे.

हे रक्तदान शिबिर मंगळवार, दिनांक ५ मे २०२६ रोजी सकाळी ९.३० ते सायंकाळी ४.०० या वेळेत ग्रीनफिंगर्स आयुर्वेदिक हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, शंकरनगर-अकलूज येथे पार पडणार आहे. या शिबिरात रक्तदानाबरोबरच विविध आरोग्य तपासण्या देखील मोफत व अल्प दरात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

शिबिरामध्ये नागरिकांसाठी मोफत रक्तदाब तपासणी, शुगर तपासणी, ईसीजी तसेच मोतीबिंदू शस्त्रक्रियेची सुविधा देण्यात येणार आहे. तसेच अल्प दरात सोनोग्राफी, एक्स-रे, पंचकर्म उपचार आणि चष्म्यांची सोयही करण्यात आली आहे. त्यामुळे या उपक्रमाचा लाभ सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणात होणार आहे.



विशेष म्हणजे रक्तदात्यांना संस्थेमार्फत आकर्षक भेटवस्तू देऊन त्यांचा गौरव करण्यात येणार आहे. यामध्ये स्मार्ट वॉच, हेल्मेट, वॉटर कॅन, ट्रिमर/ग्रूमिंग किट तसेच इयरबड्स अशा उपयुक्त भेटींचा समावेश आहे.

आयोजकांकडून सर्व नागरिकांना या शिबिरात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. "रक्तदान हेच श्रेष्ठ दान" हा संदेशातून समाजात जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून होत आहे. अधिक माहितीसाठी 9960464453 / 9503067480 या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आयोजकांनी कळविले आहे.

# सोलापूर @ ४३.९०; उष्णतेचा कडाका; अतिनील निर्देशांक १० च्या पुढे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरात उष्णतेचा कहर वाढला असून सोमवारी कमाल तापमान ४३.९ अंश सेल्सियसपर्यंत पोहोचले. दिवसभर कडक उन्हाच्या झळा जाणवत होत्या. यापूर्वीही सोलापूरचे तापमान ४४ अंशाच्या पुढे गेलेले असले तरी, सध्या पुन्हा तापमानात वाढ होत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत.

यासोबतच सोलापूरचा अतिनील (यूव्ही) निर्देशांक १० च्या पुढे गेल्याची नोंद झाली आहे. तज्ज्ञांच्या मते, अशा स्थितीत सूर्याच्या अतिनील किरणांचा शरीरावर गंभीर परिणाम होऊ शकतो. दीर्घकाळ या किरणांच्या संपर्कात राहिल्यास सनबर्न, त्वचेचे अकाली वृद्धत्व, डीएनए नुकसान, मोतीबिंदू तसेच त्वचेच्या कर्करोगाचा धोका वाढण्याची शक्यता असते.



अतिनील निर्देशांक हा विशिष्ट वेळ आणि ठिकाणी सूर्यापासून येणाऱ्या किरणोत्सर्गाची तीव्रता दर्शवतो. निर्देशांक ० ते २ दरम्यान असल्यास धोका कमी असतो, ३ ते ५ दरम्यान मध्यम धोका निर्माण होतो, तर ६ ते ७ दरम्यान त्वचा व डोळ्यांना हानी पोहोचण्याचा धोका वाढतो. मात्र, १० च्या पुढील निर्देशांक हा अत्यंत धोकादायक मानला जातो.

दरम्यान, नागरिकांनी अत्यावश्यक कामांशिवाय दुपारच्या वेळेत बाहेर पडणे टाळावे, डोके व शरीर झाकणारे कपडे वापरावेत, सनस्क्रीनचा वापर करावा तसेच पुरेसे पाणी पिऊन शरीर हायड्रेट ठेवावे, असे आवाहन प्रशासन आणि तज्ज्ञांकडून करण्यात आले आहे.

# सोलापूर जिल्ह्यात 30 एप्रिल रोजी पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर यांच्या वतीने जिल्ह्यातील नोकरी इच्छुक उमेदवारांसाठी गुरुवार, दि. 30 एप्रिल 2026 रोजी सोलापूर जिल्ह्यातील नोकरीइच्छुक उमेदवारांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून विविध औद्योगिक क्षेत्रातील नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार असून हेल्पर, केमिस्ट, क्वालिटी प्रोडक्शन, क्वालिटी इन्स्पेक्टर, सुपरव्हायझर, कॉलिटी इन्स्पेक्शन, सेल्स एक्झिक्युटिव्ह, डिजिटल मार्केटिंग टर्नर, मशिनिस्ट या पदांसाठी भरती केली जाणार आहे. या पदांसाठी 10 वी, 12 वी, बी.एससी., बी.ई., आय.टी. आय., सी.एन.सी./व्ही.एम.सी ऑपरेटर, डिप्लोमा, पदवीधर तसेच मेकॅनिकल डिप्लोमा धारक उमेदवार पात्र आहेत. एकूण 8 उद्योजकांकडून 151 पेक्षा अधिक रिक्त पदे अधिसूचित करण्यात आली आहेत.

इच्छुक उमेदवारांनी आपला अद्ययावत बायोडाटा (रिज्युमे) तीन प्रतींसह व आवश्यक कागदपत्रांसह गुरुवार दि. 30 एप्रिल 2026 रोजी सकाळी 10.00 ते दुपारी 1.00 या वेळेत 'जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थकोट पार्क चौक, सोलापूर' येथे मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.

तसेच अधिक माहितीसाठी उमेदवारांनी कार्यालयीन वेळेत दूरध्वनी क्रमांक 0217-2992956 वर संपर्क साधावा किंवा केंद्रास प्रत्यक्ष भेट द्यावी. तसेच अधिक माहितीसाठी https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन सहाय्यक आयुक्त जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र श्रीमती संगीता खंदारे यांनी केले आहे.

# वैशाली मेडिसिंगपाटील यांच्या 'हितगुज मनाशी' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**माढा (कटूसत्य वृत्त):-** वेल्वेट प्रकाशन आणि झेप सामाजिक संस्था यांच्या वतीने एकाच वेळी विविध प्रकारची 50 पुस्तके प्रकाशित करून जागतिक विक्रमाची नोंद करण्यात आली.या सोहळ्यात सोलापूर जिल्ह्यातील देवडी येथील कवयित्री वैशाली रोहित मेडसिंगपाटील यांच्या 'हितगुज मनाशी' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन प्रसिद्ध कवयित्री रोहिणी निनावे यांच्या हस्ते व समीक्षक सौमित्र पोटे आणि गायिका मंजुश्री ओक यांच्या प्रमुख उपस्थितीत नटसम्राट निळू फुले नाट्यगृह पिंपरी-चिंचवड येथे करण्यात आले.

या विक्रमाची एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद झाली आहे.यावेळी 9 ते 80 वर्षे वयोगटातील साहित्यिकांचे कथासंग्रह,काव्यसंग्रह,कादंबरी विनोदी कथासंग्रह,चारोळी संग्रह,बालकथा संग्रह आदींचे मोठ्या दिमाखदार सोहळ्यात प्रकाशन करण्यात आले.

नवोदित कवयित्री वैशाली मेडसिंगपाटील मागील 20 वर्षापासून मुंबई व पुण्यासह विविध ठिकाणी आयटीच्या क्षेत्रात कार्यरत आहेत.त्यांना लहानपणापासूनच मराठी विषयातील गोष्टी, कविता कथा वाचायची,ऐकायची आणि सांगायची आवड असल्याने त्यांनी जिद्द,चिकाटी, वडीलधाऱ्यांची प्रेरणा व मार्गदर्शन आणि मोठ्या परिश्रमातून 'हितगुज मनाशी' हा 57 कवितांचा काव्यसंग्रह तयार करून तो प्रकाशित केला आहे.





जीवन जगताना फक्त नोकरी करून पैसा कमावणे हेच अंतिम ध्येय नव्हे तर जीवनात आनंद,समाधान, आरोग्य मिळवण्यासाठी काही चांगले छंद जोपासणे आवश्यक असते.हाच विधायक दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून त्यांनी मी,श्रद्धास्थानं,नाती व आशेच्या वाटेवर या चार विभागांत कवितांचा रचना केली आहे.या कवितांचा आशय वाचक व विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी व अनुकरणीय आहे. हितगुज मनाशी हा काव्यसंग्रह म्हणजे आत्मशोध,संवेदना आणि स्त्री मनाच्या सूक्ष्म भावविश्वाचा प्रामाणिक दस्तऐवज आहे.घर-जबाबदाऱ्या,नात्यांची गुंतागुंत आणि अंतर्मनातील संवाद या सर्वांचा सुरेख संगम आहे. साध्या,सहजसुलभ व ओघवत्या भाषेत या कविता मांडण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्रीच्या भूमिकांमधील संघर्ष, अपेक्षा आणि स्वत:ला शोधण्याची जिद्द,निसर्ग, आठवणी आणि नात्यांची उब यामधून हा कवितासंग्रह वाचकाला नक्कीच अंतर्मुख करायला लावेल अशी हरहुन्नरी कवयित्री वैशाली मेडसिंगपाटील यांची अपेक्षा आहे.

यावेळी संस्थापक वर्षा ढुकरुल,सिंधु बागवे,अशोक आदक,मृणाल घोंगडे,रामचंद्र घोंगाणे,वत्सला घोंगाणे, इंजिनिअर रोहित मेडसिंगपाटील,रवींद्र घोंगाणे,वैशाली घोंगाणे यांच्यासह साहित्यिक मोठ्या संख्येने उपस्थित उपस्थित होते.

# सोलापूर महानगरपालिकेत 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क दिन' उत्साहात साजरा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र लोकसेवा हक्क दिनाचे औचित्य साधून आज सोलापूर महानगरपालिकेच्या अधिपत्याखालील सर्व विभाग आणि खात्यांमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सामूहिक शपथविधी सोहळा पार पडला. नागरिकांना पारदर्शक, गतिमान आणि विहित वेळेत सेवा मिळावी, या उद्देशाने प्रशासकीय स्तरावर हा उपक्रम राबवण्यात आला. या प्रसंगी उपायुक्त आशिष लोकरे यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, "नागरिकांना नागरी सेवा पुरवताना त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी संविधानाच्या चौकटीत 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम' प्रस्थापित करण्यात आला आहे. प्रत्येक कर्मचाऱ्याने आपली जबाबदारी प्रामाणिकपणे आणि निष्ठेने पार पाडली पाहिजे. प्रशासनाचे कामकाज इतके चोख असावे की, कोणत्याही नागरिकाला तक्रार करण्याची वेळ येऊ नये आणि प्रशासनाच्या प्रतिमेवर प्रश्नचिन्ह उभे राहू नये." कार्यक्रमाचा मुख्य उद्देश प्रशासकीय कामात पारदर्शकता आणणे आणि 'लोकसेवा हक्क कायद्या'ची प्रभावी अंमलबजावणी करून सर्वसामान्य नागरिकांच्या कामाचा निपटारा जलद गतीने करणे, हा या उपक्रमाचा मुख्य हेतू होता. या कार्यक्रमामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आपल्या कर्तव्यापती नवी ऊर्जा आणि बांधिलकी निर्माण झाल्याचे दिसून आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सर्व विभागांतील कर्मचाऱ्यांनी लोकसेवा हक्क अधिनियमाची अंमलबजावणी करण्याची शपथ घेतली. या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाला सोलापूर महानगरपालिकेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते, ज्यात प्रामुख्याने अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, माननीय उपायुक्त आशिष लोकरे, माननीय सहाय्यक आयुक्त. सौ. मनीषा मगर, मालमत्ता कर अधिकारी युवराज गाडेकर, कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी अजित कुमार खानसोळे,सामान्य प्रशासन विभाग अधिकारी. पेंढारी यांसह विविध विभागांतील विभागप्रमुख, अधीक्षक आणि मोठ्या संख्येने कर्मचारी उपस्थित होते.



# सनराइज स्कूलमध्ये दहावीतील गुणवंतांचा सत्कार; करिअर मार्गदर्शन शिबिर उत्साहात





**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** माऊली शिक्षण संस्थेच्या सनराइज इंग्लिश मिडियम गुरुकुल स्कूल, टेंभुर्णी येथे परिसरातील सीबीएसई इयत्ता दहावी परीक्षेत यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ तसेच करिअर मार्गदर्शन शिबिर उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.

कार्यक्रमाची सुरवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष योगेश (बाबाराजे) बोबडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, करिअरच्या पूर्वतयारीसाठी विद्यार्थ्यांना बाहेरगावी जाण्याची गरज नसून टेंभुर्णीतच माऊली शिक्षण संस्थेमार्फत स्टेट, जेईई, नीट यांसारख्या स्पर्धा परीक्षांची दर्जेदार तयारी करून दिली जाणार आहे. यानंतर सनराइज कायझन अकॅडमीचे संचालक विजय रॉबर्ट यांनी विद्यार्थी व पालकांना विविध शैक्षणिक शाखा आणि भविष्यातील संधी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून शाळा व शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष योगेश (बाबाराजे) बोबडे, सचिव सौ. सुरजाताई बोबडे, शैक्षणिक संचालिका सौ. शाहिदा पठाण, प्राचार्य प्रभाकर सर, प्राचार्य श्री. विकास करळे, श्री. विजय रॉबर्ट व त्यांचे सहकारी, तसेच पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजित घोरपडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सौ. मोनाली अनंतवार यांनी केले.

# 9 मे रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांचे निर्देशाप्रमाणे सन 2026 सालातील दुसरे राष्ट्रीय लोकअदालत दि. 9 मे 2026 रोजी सोलापूर जिल्ह्यातील सर्व न्यायालयात आयोजित करण्यात आलेले आहे.

सदर लोकअदालतीमध्ये फौजदारी तडजोडपात्र प्रकरणे, चेक वसुली प्रकरणे, कलम 138 एन. आय ॲक्ट ची प्रकरणे, अपघात न्यायाधिकरणाबाबतची प्रकरणे, कामगार वाद प्रकरणे, वीज व पाणी यांच्या देयकाबाबतची प्रकरणे, वैवाहिक वादाबाबतची प्रकरणे, भूसंपादन बाबतची प्रकरणे, तसेच बँक, सहकारी बँक, सहकारी पतसंस्था यांच्या वसुलीच्या दरखास्त, बँकं लवाद दरखास्त इत्यादी (प्रलंबित व दाखलपूर्व) प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत. ज्या पक्षकारांना लोकअदालतमध्ये प्रत्यक्षरित्या सहभागी होता येणार नाही त्यांच्यासाठी आभासी पध्दतीने उपस्थित राहणेकरीता ऑनलाइन माध्यमाचा वापर केला जाणार आहे.

धनादेश न वटलेल्या फौजदारी प्रलंबित प्रकरणांमध्ये धनादेशाची थोडी रक्कम भरुन प्रकरण निकाली काढता येणे शक्य होणार आहे. धनादेशाची रक्कम एक रकमी देता येणे शक्य नसल्यास ठरलेल्या रक्कमेचे हप्ते बांधून घेणे शक्य होणार आहे. काही रक्कम लोकअदालती दिवशी देवून उर्वरीत रक्कमेबाबत तडजोड हुकुमनामा करणे व संपूर्ण फौजदारी प्रकरण निकाली निघणे शक्य होणार आहे. परिणामी पक्षकारास न्यायालयात पुन्हा हजर राहण्याची आवश्यकता राहणार नाही.

**लोकन्यायालयाचे फायदे**

- प्रकरणाचा झटपट निकाल लागतो. तोंडी पुरावा उलट तपासणी, दिर्घ युक्तीवाद या बाबी टाळल्या जातात.
- लोकन्यायालयाच्या निवाड्याविरुध्द अपील नाही. एकाच निर्णयात कोर्ट बाजीतून कायमची सुटका होते.
- लोकन्यायालयात होणारा निवाडा हा आपसात समझोतीने होत असल्याने ना कोणाचा जय होतो ना कोणाची हार.
- लोकन्यायालयाचा निवाडा दोन्ही पक्षांना समाधान देतो.
- परस्पर संमतीने निकाल होत असल्याने एकमेकांतील द्वेष वाढत नाही व कटूताही निर्माण होत नाही.
- न्यायालयाच्या हुकुमनाम्याप्रमाणेच लोकन्यायालयात होणा-या निवाडयाची अंमलबजावणी न्यायालयामार्फत करता येते.
- वेळ आणि पैसा दोघांचीही बचत होते.
- लोकन्यायालयात निकाली निघणा-या प्रकरणांमध्ये कायदयानुसार कोर्ट फी ची रक्कम परत मिळते.

सदर राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये जास्तीत जास्त पक्षकारांनी आपापली प्रकरणे तडजोडीने मिटवुन लोकअदालतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्ष मनोज शर्मा यांनी केले आहे.

# आसरा रेल्वे ब्रीजसाठी अडथळा ठरणाऱ्या तीन इमारतींचे बांधकाम निष्कासीत

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अरुंद पडत असलेल्या आसरा रेल्वे ब्रीजच्या रुंदीकरणासाठी अखेर महापालिका प्रशासनाने ठोस पाऊल उचलत पुलालगत असलेल्या तीन इमारतींचे बांधकाम सोमवारी निष्कासित केले. अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने जेसीबीच्या सहाय्याने ही कारवाई केली.

होटगी रोड ते आसरा मार्गे जुळे सोलापूरात येणाऱ्या वाहनधारकांसाठी हा रेल्वे पूल अपुरा ठरत होता. पुलाच्या अरुंदतेमुळे या परिसरात वारंवार वाहतूक कोंडी होत होती. त्यामुळे नागरिक, विविध संघटना आणि राजकीय पक्षांकडून पुलाची रुंदी वाढविण्याची मागणी सातत्याने केली जात होती.

या पार्श्वभूमीवर आमदार सुभाष देशमुख यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा करून या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून दिला. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून रेल्वे प्रशासनाने पुलाच्या उभारणीचे काम हाती घेतले आहे.

दरम्यान, पुलाच्या कामासाठी अडथळा ठरणाऱ्या बांधकामांबाबत रेल्वे विभागाने महापालिकेला दोनवेळा पत्र पाठवले होते. त्यानुसार नगररचना विभागाने संबंधित इमारतधारकांना नोटिसा देऊन अंतिम सूचना दिली होती. काही बांधकामे यापूर्वीच निष्कासित करण्यात आली होती; मात्र उर्वरित तीन इमारती हटविल्या गेल्या नव्हत्या.

सोमवारी सकाळी अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने पोलीस बंदोबस्तात नियोजनबद्ध पद्धतीने कारवाई सुरू केली. नगररचना विभागाने केलेल्या मार्किंगनुसार या तीनही इमारतींचे संपूर्ण बांधकाम दुपारपर्यंत पाडण्यात आले. या कारवाईदरम्यान नियंत्रण अधिकारी स्वतः उपस्थित राहून पथकाला मार्गदर्शन करत होते. अधिकारी जगन्नाथ बनसोडे, दीपक कुंभार यांच्यासह कर्मचाऱ्यांनी ही मोहीम पूर्ण केली.

या कारवाईनंतर आसरा रेल्वे ब्रीजच्या उभारणीसाठीचा मार्ग मोकळा झाला असून, लवकरच प्रत्यक्ष कामाला वेग येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.



# एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीचे यश

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्राबरोबरच सामाजिक व वैचारिक क्षेत्रातही उल्लेखनीय यश संपादन केल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. महाविद्यालयातील विद्यार्थिनी कु. आरती गायकवाड हिने कोल्हापूर येथे आयोजित कार्यक्रमात 'महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय विचार प्रेरणा पुरस्कार - २०२६' प्राप्त करून महाविद्यालयाचा मान उंचावला आहे. कोल्हापूर येथे आयोजित भव्य सोहळ्यात विविध मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. समाजकार्य, वैचारिक प्रबोधन आणि सांस्कृतिक क्षेत्रातील योगदानाबद्दल आरती गायकवाड हिची निवड करण्यात आली होती. या यशाबद्दल तिचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

तसेच, मा. आ. सतेज उर्फ बंटी डी. पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'भव्य सतेज काव्य संमेलन' मध्ये सहभाग नोंदवत तिने आपली साहित्यिक गुणवत्ता देखील सिद्ध केली. या सहभागाबद्दल तिला प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.



या उल्लेखनीय यशाबद्दल एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, सोलापूर येथे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले व प्राचार्य डॉ. शंकर नवले यांच्या हस्ते आरती गायकवाड हिचा सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी तिच्या कार्याचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक गुणवत्तेतच नव्हे, तर सामाजिक जाणीवा व वैचारिक क्षेत्रातही प्रगती साधावी, हा महाविद्यालयाचा उद्देश असून आरती गायकवाड हिचे यश हे त्याचे उत्तम उदाहरण असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.